# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, पुणे सन:२०१६-१७

## ५अ फेरीचे प्रसिध्दी निवेदन

दि.०३.०८.२०१६.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांचे इयत्ता ११वी चे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होत आहेत. या प्रवेश प्रक्रियेत ७३,३८५ जागांसाठी ७३,९६१ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी फक्त १४२ विद्यार्थ्यांनाच त्यांचे पसंतीक्रम व कटऑफ न जुळल्यामुळे चौथ्या फेरी अखेर कॉलेज ॲलॉट होऊ शकले नाहीत.

एक बेटरमेंट मिळाल्यामुळे तक्रार केलेले विद्यार्थी, दूर अंतरावरील कॉलेज मिळालेले विद्यार्थी व इतर काही कारणांमुळे मिळालेले कॉलेज बदलून मिळावे यासाठी तक्रारी करणा-या विद्यार्थी व पालकांच्या मागणीचा विचार करुन दिनांक २१.०७.२०१६ रोजी नवीन वेळापत्रक जाहिर करण्यात आले होते. तथापि, विद्यार्थ्यांच्या मागणीचा विचार करुन निर्णय घेण्यासाठी व वेळापत्रकामध्ये काही अंशतः बदल करण्यासाठी दि. २९.०७.२०१६ रोजी मा. मंत्री महोदयांनी मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा तसेच शिक्षण उपसंचालक पुणे व मुंबई, केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती सदस्य, पुणे व मुंबई यांच्या समवेत तातडीची बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये पुणे व मुंबई विभागातील प्रवेश प्रक्रियेतील विविध बाबीसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. भौगोलिक भिन्नतेमुळे, वाहतूकींच्या सुविधांमधील भिन्नतेमुळे वेळापत्रकात काही बदल करणे आवश्यक होते. मा. विनोदजी तावडे, शालेय शिक्षण व क्रीडा मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पुढील सुधारित वेळापत्रकास व कार्यपध्दतीस मान्यता दिलेली होती.

पाचवी फेरी

५अ) लांब अंतरावरील कॉलेज मिळालेले, एक बेटरमेंट घेवुन बाहेर पडलेले, प्रवेश रद्द केलेले, प्रवेश न घेतलेले, शाखा/माध्यम बदलणारे, पसंतीक्रम चुकीचा नोंद केलेले, व अन्य कोणत्याही कारणांसाठी कॉलेज बदल हवे असलेले व चौथ्या फेरी अखेर ॲलॉटमेंट न झालेले १४२ विद्यार्थी असे प्रवेश प्रक्रियेमध्ये सुरुवातीपासून सहभागी असणा-या विद्यार्थ्यांचा यात समावेश असेल अशा विद्यार्थ्यांनी तसेच ५ब) अद्याप ऑनलाईन अर्ज न केलेले, अपुर्ण अर्ज असलेले अशा दोन्ही गटातील (५अ व ५ब) विद्यार्थ्यांनी दि. ३० जुलै २०१६ रोजी वेबसाईटवर प्रसिध्द होणा-या रिक्त जागांचा तपशिल पाहून पसंतीक्रम दि. १ व २ ऑगस्ट २०१६ रोजी रात्री ११.०० वाजेपर्यंत अर्ज भरलेले आहेत.

| अ. .क्र. | शाखा | गट-५अ फेरीसाठी रिक्त जागा | पुर्वीचे विद्यार्थी (Option Form) ऑप्शन फॉर्म भरलेले (गट-५अ) | गट-५अ फेरीसाठी प्रवेश दिलेले |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | कला (मराठी) | ४४२७ | ९४७ | ९०० |
| २ | कला (इंग्रजी) | ३०६५ | ३८६ | ३०७ |
| ३ | कॉमर्स(मराठी) | ३८१५ | २५६२ | २२९२ |
| ४ | कॉमर्स (इंग्रजी) | ६१५३ | ४३०८ | ३३६६ |
| ५ | विज्ञान(इंग्रजी) | ८८८८ | ६२२४ | ५०२९ |
| | एकुण | २६३४८ | १४४२७ | ११८९४ |

नव्याने अर्ज भरलेले एकुण २०११ विद्यार्थी यांचा ५ब मधील गटात समाविष्ट करण्यात येईल.

पाचव्या फेरीतील ५अ या गटातील वरील प्रमाणे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी पुढील वेळापत्रकानुसार प्रवेश घ्यावा.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | पाचवी फेरी गट-५अ मधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करणे. | दि. ४ ऑगस्ट २०१६ स.११.०० वा. |
| २ | पाचवी फेरी गट- ५अ मधील विद्यार्थ्यांचे गुणवत्ता यादीप्रमाणे प्रवेश | दि. ४ ऑगस्ट २०१६, स. ११ ते ५ वाजेपर्यंत<br>दि. ५ ऑगस्ट २०१६ स. ११ ते ५ वाजेपर्यंत |

पाचवी फेरी

गट-५ब).

पाचव्या फेरीतील ५ब या गटातील समाविष्ट विद्यार्थी १) पहिल्यांदा नवीन अर्ज केलेले २) अपूर्ण अर्ज पूर्ण केलेले ३) ५अ फेरीत प्रवेश न मिळू शकलेले यांचा एकत्रित विचार केला जाईल.

पाचव्या फेरीतील गट-५ब मधील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता यादी दि. ०८.०८.२०१६ रोजी सकाळी ११.००० वाजता जाहीर केली जाईल.

५ब गटातील विद्यार्थ्यांसाठी वेळापत्रक पुढील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | पाचवी फेरी गट-५ब मधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करणे. | दि. ८ ऑगस्ट २०१६ स.११.०० वा. |
| २ | पाचवी फेरी गट-५ब मधील विद्यार्थ्यांचे गुणवत्ता यादीप्रमाणे प्रवेश | दि. ८ ऑगस्ट २०१६ ,स. ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत<br>दि. ९ ऑगस्ट २०१६ स. १०.०० ते ३.०० वाजेपर्यंत |

: पाचव्या फेरीतील ५अ गटातील विद्यार्थ्यांसाठी सूचना :-

१) ५अ गटातील विद्यार्थ्यांनी इ. ११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या http://pune.fyjc.org.in या संकेतस्थळावर आपला ऑनलाईन ॲप्लीकेशन फॉर्म क्रमांक टाकुन कोणते कॉलेज मिळाले आहे ते पाहावे.

२) मिळालेल्या कॉलेज मध्ये प्रवेश घ्यायचा निश्चित असेल तरच यापुर्वी मिळालेला प्रवेश संबधित कॉलेजमध्ये जावुन ऑनलाईन रद्द करुन, प्रवेश रद्द केल्याची संगणकीकृत पावती घेवुन ५अ फेरीत मिळालेल्या कॉलेजमध्ये अंतिम प्रवेश घ्यावा. कॉलेजची संपुर्ण फी भरलेली असेल तर प्रवेश रद्द करतांना त्या फी च्या रक्कमेतील फक्त रु. २००/- (दोनशे) कमी करुन उर्वरित सर्व फी ची रक्कम व मुळ कागदपत्रे विद्यार्थ्यास त्वरीत परत केली जातील.

३) ५अ फेरीमध्ये अर्ज करुनही प्रवेश मिळाला नसेल तर अशा विद्यार्थ्यांचा ५ब च्या गुणवत्ता यादीत समावेश केला जाईल, या विद्यार्थ्यांसाठी दि.०८ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता गुणवत्ता यादी जाहीर केली जाईल.

४) पाचव्या फेरीनंतरचे विशेष फेरींचे वेळापत्रक यापुर्वी जाहीर केलेले आहे. त्याबाबतच्या सविस्तर सूचना दि.०९ ऑगस्ट २०१६ रोजी जाहीर केले जाईल.

(दिनकर टेमकर)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१